# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)६९९६५५५५, फॅक्स :(०२२)६९९६५५९९** **ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**


जा. क्र./मरासुम/प्रशासन/2564/२०२४ दि.14/०८/२०२४.

## -: जाहिरात :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या मुख्यालयामध्ये एक नग नवीन सर्वर तसेच सर्वरकरिता License खरेदी करणेकरिता पुरवठादाची निवड करण्यासाठी प्रस्तूत जाहिरात देण्यात येत आहे.

या सोबत सविस्तर जाहिरात प्रसिध्द् करण्यात येत आहे. इच्छूक पुरवठादार यांनी सदरची जाहिरात सविस्तर वाचून त्यात नमुद सर्वर खरेदीकरिता आपले दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या वरील नमुद पत्यावर दि.14/08/२०२४ ते 28/08/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत सादर करावी.

सविस्तर जाहिरातीकरिता महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in आणि https://mahasecurity.gov.in/ वेबसाईटला भेट द्यावी.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

## १. प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत केंद्र व राज्य शासनाची कार्यालये, त्यांचे उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शासकीय किंवा निमशासकीय संस्था, खाजगी बंदरे व लहान धक्के, धरणे व द्रुतगती मार्ग इत्यादी पायाभुत सुविधांना आणि मॉल्स, मल्टिप्लेक्स, क्लब, हॉटेल इत्यादी यांसह वाणिज्यिक आस्थापनांना, सुरक्षा व संरक्षण पुरविणे हे महामंडळाचे प्रमुख उद्दीष्टे आहे.

महामंडळाच्या मुख्यालयातील विविध विभागातील संगणकीय व इतर डाटा संरक्षित व सुरक्षितता यासाठी एक नग नवीन सर्वर व त्याकरिता Licence खरेदी करावयाचा आहे. सर्वरची स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे:

| Sr. No. | Server Name | Server Specification |
|---|---|---|
| 1 | Dell 2U Rack Model PowerEdge R750XS | 2 x Intel Xenon Silver 4309y 2.8G, 8C / 16T, 10.4GT /s, 12M Cache, Turbo, HT (105W) DDR4-2666, 1x Standard HEATSINK, 1x Riser Config 0, Half Length, Low Profilce, 5x16 + 1x4 slots, 4 x Dell Memory Upgrade – 32GB -2RX8 DDR4 RDIMM 3200Mhz 16Gb BASE, 5 x 2.4TB 10K RPM SAS 12Gbps 512e 2.5in Hot-plug Hard Drive, 3.5in HYB CARR, Broadcom 5720 Dual Gigabit Ethernet Port Card, Onboard LOM, Idrac9, Enterprise, Dual, Hot-Plug, PSU (1+1), 800, Mixed Mode, PERC H755 Adapter, Low Profile, 3.5" Chassis with up to 12 Hard Drives (SAS/SATA), 5YR ProSupport 4Hr and Mission Critical 5 Years Warranty |
| 2 | License | MS Windows 2022 Server STD 16-Core OEM Software (Lifetime) |

- **सर्वर Installation आणि Configuration हे दोन्ही कामे पूरवठाधारकास करावयाची आहेत.**

## २) पुरवठादार यांनी सादर करावयाची कागदपत्र :-

१. पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार व ओळखपत्र इ. पैकी कोणतेही एक ओळखपत्र.
२. पुरवठादारांच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

## ३) दरपत्रक सादर करण्यासाठी कार्यालयाचा पत्ता :-

व्यवस्थापकीय संचालक तथा पोलीस महासंचालक,<br>
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.<br>
सेंटर - १, ३२वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.<br>
दूरध्वनी क्र.: (०२२)६९९६५५५५, ई-मेल आय.डी.- **info.mahasecurity@maharashtra.gov.in**

**४) दरपत्रक सादर करण्याचा कालावधी :-**

दिनांक :-१५/०८/२०२४ ते दि.२८/०८/२०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत.

**५) दरपत्रक उघडण्याची दिनांक व ठिकाण :-**

दिनांक :- :-२९/०८/२०२४ वेळ १२.०० वाजता.

ठिकाण :- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी क्र.:(०२२)६९९६५५५५, फॅक्स नंबर:- (०२२)६९९६५५९९
ई-मेल आय.डी.- **info.mahasecurity@maharashtra.gov.in**

दरपत्रक उघडताना दरपत्रकधारक यांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. उपस्थित न राहिल्यास दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

**६) सूचना :-**

दरपत्रक सादर करणेपुर्वी खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

१. दरपत्रकामध्ये सर्वर व त्याकरिता Licence बाबतचा सर्व तपशील अचुक नमूद करणे आवश्यक आहे.
२. दरपत्रकामध्ये वस्तूची मूळ किंमत त्यांची Installation rate, License व इतर कर - जी.एस.टी., इत्यार्दीबाबींकरीता येणारा खर्च स्पष्ट व स्वतंत्रपणे नमूद करण्यात यावा.
३. दरपत्रकामध्ये G.S.T. क्रमांक, बँकेचा तपशील नमूद करण्यात यावा.
४. सदरच्या सर्वरची वर्क ऑर्डर दिल्यानंतर, आठ दिवसात Installation व Configuration करावे लागेल.
५. दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात पोस्टाने कुरीअरद्वारे पाठविण्यात येत असल्यास अंतिम दिनांकापुर्वी महामंडळाच्या कार्यालयास पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
६. एका वेळेस एकच दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. एका पुरवठादाने अनेक दरपत्रक सादर केल्यास त्याची सर्वच दरपत्रके बाद करण्यात येतील.
७. दरपत्रकधारक यांची G.S.T. अंतर्गत नोंदणी अनिवार्य आहे.

**७) <u>निवड प्रक्रिया :-</u>**

१. निवड केलेल्या पुरवठादारास निवड केल्याबाबतचे पत्र ई-मेल किंवा पत्राद्वारे कळविले जाईल.

२. निवड प्रक्रिये दरम्यान आवश्यकता भासल्यास (Negotiation) कार्यालयास हजर रहावे लागेल.

३. Installation आणि Configuration त्याचप्रमाणे सर्वर पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर निवड झालेल्या पुरवठादाराने टॅक्स इनव्हाईस सादर करावे व त्यानंतर त्यांना देयक अदा करण्यात येईल. टॅक्स इन्व्हाईसमध्ये पुरवठादाराचा जी.एस.टी. क्रमांक, पॅन क्रमांक आणि बँकेचा तपशील (दरपत्रकात नमूद केल्याप्रमाणे ) नमूद असणे आवश्यक आहे.

**सदर जाहिरात कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही टप्प्यावर/पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.